**उमवि एम.ए. जनसंवाद आणि पत्रकारिता प्रवेशपूर्व सीईटी ११ जुलैला ..**
**कोणत्याही शाखेचे पदवीधर घेऊ शकतात प्रवेश .**

जळगाव , दि . २९ जून ( ) येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी इच्छुक असणाऱ्या पदवीधर विद्यार्थ्यांसाठी दि. ११ जुलै ला मंगळवारी उमवित संबंधित विभागात सीईटी म्हणजेच कॉमन एंट्रन्स टेस्ट या पूर्वपरीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे .

युजीसी च्या अभ्यासक्रमानुसार आता या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागा विषयाची पुनर्रचना करण्यात आलेली असून,रोजगाराभिमुख आणि कौशल्यपूर्ण शिक्षण या माध्यमातून आता उमवि उपलब्ध झालेले आहे. इलेकट्रॉनिक,प्रिंट आणि इतर प्रसार माध्यमांमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या खान्देशसह महाराष्ट्र आणि देश विदेशातील विद्यार्थ्यांना ही सुवर्ण संधी या माध्यमातून मिळणार आहे. सदर अभयासक्रमात प्रवेशासाठी पूर्वपरीक्षा देणे अनिवार्य असून,कोणत्याही शाखेचे पदवीधर ही दि. ११ जुलै ला होणारी सीईटी परीक्षा देण्यास पात्र असणार आहेत. ही परीक्षा सामान्यज्ञान,लेखन कौशल्य आणि भाषांतर यावर आधारीत बहुपर्यायी स्वरूपाची असेल.

खान्देशातील तसेच राज्य आणि देशातील इच्छुक युवकांनी प्रवेश परीक्षेत सहभागी होण्यासाठी ९ जुलै पर्यंत उमवि जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात नावनोंदणी करणे गरजेचे असून, अधिक माहितीसाठी कला व मानवविद्या प्रशाळेचे प्र. संचालक आणि संबंधित विभाग प्रमुख प्रा.डॉ.तुकाराम दौड मो.क्र.९४२०४२८४५३ आणि सहाय्यक प्रा.डॉ.सुधीर भटकर मो.क्र.९४२३४९००४४ आणि कार्यालय दूरध्वनी ०२५७ २२५८००८ यावर तसेच उमविच्या http://www.nmu.ac.in/
या संकेतस्थळावर भेट द्यावी.
..........................................................................